ग्राम : पाणी मंडळ,मुंबई

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट,मुंबई ४०० ०२१

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/२०१५ दिनांक : १ ऑगस्ट, २००२

## तांत्रिक परिपत्रक क्र.८०

**विषय** : अतिरिक्त बाबींच्या (Extra Items) मंजूरीच्या अधिकाराबाबत.

**संदर्भ** :१. या कार्यालयाचे दि.३/१/९९ चे परिपत्रक क्र.२७

२. या कार्यालयाचे दि.२७/१०/९९ चे पत्र क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/२२२४

३. या कार्यालयाचे दि.२२/२/२००१ चे पत्र क्र.मजीप्रा/सस/ तांशा-१/३५०/५९०

अतिरिक्त बाबींच्या मंजूरीच्या अधिकाराबाबतच्या सूचना संदर्भीय पत्रान्वये निर्गमित करण्यांत आलेल्या होत्या. या अधिकारांमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने दि.२५ जुलै, २००२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या ३९ व्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात येवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

संदर्भीय पत्रान्वये निर्गमित करण्यांत आलेल्या सर्व सूचना या परिपत्रकान्वये रद्द करण्यांत येत आहेत. अतिरिक्त बाबींच्या मंजूरीच्या अधिकाराबाबत आता खालीलप्रमाणे सुधारित सूचना निर्गमित करण्यांत येत आहेत.

| अधिकाऱ्याचे नाव | अतिरिक्त बाबींच्या मंजूरीचे अधिकार |
|---|---|
| कार्यकारी अभियंता | प्रत्येक अतिरिक्त बाबीसाठी रु.२५,०००/- पण सर्व अतिरिक्त बाबींवरील एकूण मंजूरीची मर्यादा रु.१० लक्ष पर्यंत या एकूण अतिरिक्त बाबींच्या मंजूरीमुळे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळालेल्या किंमतीत वाढ होऊ नये यापैकी जी कमी असेल त्या मर्यादेपर्यंत. |
| अधीक्षक अभियंता | प्रत्येक अतिरिक्त बाबीसाठी रु.१० लक्ष पण सर्व अतिरिक्त बाबींवरील एकूण मंजूरीची मर्यादा रु.५० लक्ष वा अतिरिक्त बाबींच्या मंजूरीमुळे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळालेल्या किंमतीत वाढ होऊ नये यापैकी जी कमी असेल त्या मर्यादेपर्यंत. |
| मुख्य अभियंता | प्रत्येक अतिरिक्त बाबीसाठी रु.२५ लक्ष पण सर्व अतिरिक्त बाबींवरील एकूण मंजूरीची मर्यादा रु.१०० लक्ष वा अतिरिक्त बाबींच्या मंजूरीमुळे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळालेल्या किंमतीत वाढ होऊ नये यापैकी जी कमी असेल त्या मर्यादेपर्यंत. |
| सदस्य सचिव(तांत्रिक) | पूर्ण अधिकार परंतु अतिरिक्त बाबींच्या मंजूरीमुळे योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असणार नाही. |

**टिप** :- ज्या प्रकरणी अतिरिक्त बाब मंजूर केल्याने योजनेच्या खर्चात वाढ होऊन योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता भासणार असेल तर सदर अतिरिक्त बाब मंजूर करण्याचे प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या बैठकीमध्ये सादर करावेत. सदर प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार म.जी.प्राधिकरणच्या निविदा समितीस राहतील.

**हे अधिकार परिपत्रकाच्या दिवशी प्रलंबित असणाऱ्या व या पुढील सर्व प्रकरणी लागू राहतील.**

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव

प्रत :मा.मंत्री,ग्रा.वि.,पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष,मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी सादर.
मा.राज्यमंत्री,पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष,मंत्रालय,मुंबई यांचे माहितीसाठी सादर
मा.राज्यमंत्री,नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष,मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी सादर
सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी सादर.
सर्व मुख्य अभियंता,म.जी.प्रा. ............ यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
सर्व अधीक्षक अभियंता,म.जी.प्रा.मंडळ, ............ यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता,म.जी.प्रा.सर्व विभाग, ............ यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.